| MHKO110009832016 | नियमित दिवाणी दावा क्र. १६४/२०१६<br>आदेश निशाणी क्रमांक ९१<br>(श्री.सुरेंद्र धोंडीराम शिंदे वगैरे विरुध्द श्री.तुकाराम दादु गुरव ) |
|---|---|

वादीतर्फे वारस यांनी सदरचा अर्ज वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचेविरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीतर्फे वारस यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत कामातील वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे हे दिनांक ०८.०४.२०२४ रोजी मयत झालेले आहेत. सदर वादीतर्फे वारस यांनी वादी यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेने प्रस्तुतचा दावा हा वादीच्या वारसांविरुध्द अबेट झालेला आहे. सबब त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी यांनी निशणी ९४ वर त्यांचे म्हणणे सदर अर्जावर दाखल करुन प्रस्तुतचा अर्ज हा बेकायदेशीर आहे. या कामी वादीने विलंब माफीचा अर्ज केलेला आहे. तसेच या अर्जातील कथने खोटी व चुकीची आहेत. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करणेविषयी विनंती केलेली आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत मे.कोर्ट येतील तर प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करावा अशी विनंती केली आहे.

४. वादी यांच्या अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता त्याकरीता वादी क्रमांक २ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश जरी पारीत करणेत आलेला नाही सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वादी क्रमांक २ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे गरजेचे आहे. वादी क्रमांक २ यांचे कायेदशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आ दे श -**

१. वादीतर्फे वारस यांचा (निशाणी क्र. ९४) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीतर्फे वारस यांच्या अर्जानुसार मयत वादी क्रमांक २ भिमराव धोंडीराम शिंदे यांचे विरोधात झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येत आहे.

Sd/-
( श्रीमती एस.जे.पेंडे )
०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.पेठवडगांव.

ठिकाण – पेठवडगांव
दिनांक - १३.१२.२०२४